RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ६] गुरुवार, जानेवारी २१, २०१६/माघ १, शके १९३७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. | पृष्ठे १-३ |


**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जानेवारी २०१६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2016.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE
SOCIETIES ACT, 1960.

**सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६१ चा महा. २४.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१६ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३कअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३कअ मध्ये, पोट-कलम (३) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६१ चा २४.

“ (३अ) विमा उतरविलेल्या सहकारी बँकेच्या बाबतीत, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी दहा वर्षांच्या कालावधीच्या आत, कोणत्याही वेळी किंवा अशा प्रारंभानंतर कोणत्याही वेळी, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मागणीनुसार, जर तिची समिती निष्प्रभावित करण्यासाठीचा आदेश, कलम ११०अ अन्वये काढलेला असेल तर, अशा समितीचा कोणताही सदस्य, समिती निष्प्रभावित करण्यासाठीच्या आदेशाच्या दिनांकापासून समितीच्या दोन मुदतींच्या कालावधीकरिता अशा बँकेच्या समितीवर सदस्य म्हणून पुन्हा नियुक्त केला जाण्यास, पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास, पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा अशा बँकेच्या किंवा इतर कोणत्याही बँकेच्या समितीचा सदस्य म्हणून राहण्यास किंवा तिचा सदस्य म्हणून नियुक्त केला जाण्यास, नामनिर्देशित केला जाण्यास, निवडून येण्यास किंवा स्वीकृत केला जाण्यास पात्र असणार नाही.”. २०१६ चा महा. अध्या. २.

## निवेदन.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महा. २४) यामध्ये राज्यातील सहकारी चळवळीच्या सुव्यवस्थित विकासाची तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ११०अ मध्ये, विमा उतरविलेल्या सहकारी बँकेचे समापन करणे, तिची पुनर्रचना करणे, तिची समिती निलंबित किंवा निष्प्रभावित करणे, वगैरे संबंधीचा आदेश त्यात नमूद केलेल्या परिस्थितीमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने मंजुरी दिल्यावर, किंवा मागणी केल्यावर देणे, याकरिता तरतूद केलेली आहे.

नागरी सहकारी बँका निष्प्रभावित केलेल्या संपूर्ण संचालक मंडळास, ज्या कृत्यांच्या परिणामी समित्या निष्प्रभावित होतात त्यांची पुनरावृत्ती होण्यापासून जनतेचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने, किमान दोन मुदतींकरिता संबंधित नागरी सहकारी बँकांचे संचालक म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा स्वीकृत केले जाण्यास किंवा पुनः नामनिर्देशित केले जाण्यास अपात्र ठरविण्याकरिता उक्त अधिनियमात सुधारणा करण्याबाबतचे उपाय योजण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा करीत आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ७३कअ मध्ये त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कारणांवरून समितीच्या व तिच्या सदस्यांच्या अपात्रतेची तरतूद आहे. ठेवीदार, बँका आणि राज्य शासन यांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या आणि सहकारी बँकांमधील अनियमिततेस आळा घालण्याच्या आणि वसुली करण्यामध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने, उक्त कलम ७३कअ मध्ये यथोचितरित्या सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते. त्या प्रयोजनार्थ, प्रस्तावित तरतुदीच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी दहा वर्षांच्या कालावधीच्या आत कोणत्याही वेळी किंवा अशा प्रारंभानंतर कोणत्याही वेळी विमा उतरविलेल्या बँकांच्या बाबतीत, भारतीय रिझर्व्हे बँकेच्या मागणीनुसार कलम ११०अ अन्वये, विमा उतरविलेल्या बँकेची समिती निष्प्रभावित करण्याचा आदेश काढण्यात आला असेल तर, अशा समितीचा कोणताही सदस्य, समिती निष्प्रभावित करण्यासाठीच्या आदेशाच्या दिनांकापासून समितीच्या दोन मुदतींच्या कालावधींकरिता, अशा बँकेच्या समितीवर पुनर्नियुक्त केला जाण्यास, पुनः नामनिर्देशित केला जाण्यास, पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा अशा बँकेच्या किंवा इतर कोणत्याही बँकेच्या समितीचा सदस्य म्हणून राहण्यास किंवा तिचा सदस्य म्हणून नियुक्त केला जाण्यास, नामनिर्देशित केला जाण्यास, निवडून येण्यास किंवा स्वीकृत केला जाण्यास पात्र असणार नाही, अशी तरतूद करण्याचे प्रस्तावित केले आहे.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४), यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यापालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २० जानेवारी २०१६.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रभाकर देशमुख,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.